स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-॥ अंतर्गत, सन २०२०-२१ च्या वार्षिक कृती आराखड्यात समाविष्ठ असलेल्या गावामध्ये प्रकल्प अंमलबजावणी वैयक्तिक तसेच सार्वजनिक स्तरावर घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : स्वभामि २०२०/प्र.क्र.११६ /पापु-१६**
**मंत्रालय, मुंबई ४०० ००१.**
**दिनांक : १२ जानेवारी,२०२१.**

वाचा -

१) स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-॥,बाबत केंद्र शासनाच्या माहे जुलै,२०२० च्या मार्गदर्शक सूचना.
२) शासन परिपत्रक क्रमांक : स्वभामि २०२०/प्र.क्र.११६ /पापु १६, दिनांक २८/१०/२०२०.
३) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्रमांकःझेडपीए-२०१५/प्र.क्र.१०/वित्त-९,दिनांक २५/०३/२०१५ व दिनांक २३/०२/२०१८.
४) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:- झेडपीए-२०१६/प्र.क्र.५६/वित्त-९, दिनांक ०७/१०/२०१७.
५) ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:- पंविआ-२०२०/प्र.क्र.५९/वित्त-४, दिनांक २६/०६/२०२० व शासन निर्णय क्रमांक:-पंविआ-२०२०/प्र.क्र.६२/वित्त-४,दिनांक २७/०७/२०२०.

केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचनांनुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)टप्पा- ॥ अंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाबाबत, संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. सदर सुचनांच्या अनुषंगाने पुरक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. सन २०२०-२१ च्या वार्षिक कृती आराखड्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीकरिता उपलब्ध असलेला अल्प कालावधी (दिनांक ३१/०३/२०२१ पर्यंत) विचारात घेता, पुढीलप्रमाणे पुरक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत:-

अ)घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन आराखडा तयार करण्याच्या प्रक्रियेसंदर्भात सोबत जोडलेल्या आराखडा मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी. ( विवरणपत्र )

आ) गावाकडून विहित प्रपत्रामध्ये ( संदर्भाधीन शासन क्रमांक २ मधील प्रपत्र-अ ) प्राप्त झालेल्या आराखड्याला तांत्रिक मान्यता तथा प्रशासकीय मान्यता प्रदान केल्यानंतर, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-॥ अंतर्गत अनुज्ञेयतेच्या मर्यादेत गावस्तरीय घनकचरा व सांडपाणी उपांगासाठी करावयाची कार्यवाही, संदर्भाधीन शासन क्रमांक २ येथील मार्गदर्शक सूचनेनुसार करण्यात यावी. तसेच कृतीसंगम अंतर्भूत असलेली कामे हाती घेताना, कृतीसंगम निहाय विविध यंत्रणा/विभाग यांच्या प्रचलित असलेल्या कार्यपद्धतीने तथा वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गर्शक सूचनेनुसार हाती घ्या.

इ) संदर्भाधीन क्रमांक ४ येथील, ग्राम विकास विभागाच्या दिनांक ०७/१०/२०१७ च्या शासन निर्णयामध्ये, जिल्हा परिषदांमधील विविध विकास योजना राबविण्याकरिता प्रशासकीय मंजूरी देण्याबाबत तरतूद नमूद करण्यात आली आहे. तथापि सदर शासन निर्णयामध्ये, विकास योजनांना द्यावयाच्या तांत्रिक मान्यतेचा उल्लेख नसल्याने, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या कामाच्या अनुषंगाने, रूपये ५.० लक्ष पर्यंत व रूपये ५.० लक्ष पेक्षा जास्त किंमतीकरिता तांत्रिक मंजूरी देण्याचे अधिकार, अनुक्रमे उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांना राहतील.

तसेच ग्राम विकास विभागाच्या दिनांक ०७/१०/२०१७ च्या शासन निर्णयासोबतच्या, कोष्टकातील भाग-२ मधील तरतूदी विचारात घेता, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)टप्पा-॥ अंतर्गत, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या कामांसाठी रूपये ५.० लक्ष पर्यंत प्रशासकीय मंजूरी देण्याचे अधिकार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना व रूपये ५.० लक्ष पेक्षा जास्त किंमती करिता, प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचे अधिकार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना राहतील

ई) संदर्भाधीन क्रमांक ३ येथील, ग्राम विकास विभागाच्या दिनांक २३/०२/२०१८ च्या शासन निर्णयामध्ये, नमूद केलेली कार्यपद्धती अनुसरून, स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण)टप्पा-२ अंतर्गत, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या कामे "अंमलबजावणी यंत्रणा " म्हणून ग्रामपंचायतींनी पूर्ण करावीत.

उ) जिल्हास्तरीय कृती उपांगासाठी जसे मासिकपाळी व प्लास्टिक व्यवस्थापन (तालुका स्तर), गोबरधन व मैला गाळ व्यवस्थापन यासाठी, संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन परिपत्रकातील सूचनेनुसार कार्यवाही करण्यात यावीत.

ऊ) संदर्भाधीन क्रमांक ५ येथील ग्राम विकास विभागाच्या शासन निर्णयातील तरतुदीस अनुसरून १५ व्या वित्त आयोगाच्या कृती संदर्भात कार्यवाही करावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०१११२०९३९१७२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrakant Krishna More

Digitally signed by Chandrakant Krishna More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=11ac200219edb36f7777ee1101657bea4271090267228122b638d6f2cdedad62, serialNumber=2314cf333e070f9936792bc95890fa89b2f617a931b2b577b703fa858f3df433, cn=Chandrakant Krishna More
Date: 2021.01.12 15:26:53 +05'30'

**( चं. कृ. मोरे )**
अवर सचिव,महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. विधानसभा व विधानपरिषद सदस्य.
५. मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व,मंत्रालय, मुंबई.
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
८. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष ,सर्व.
९. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी
१०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११.सहसचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२.प्रकल्प संचालक (स्वभामि), राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.
१३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.
१४.उपायुक्त (विकास), सर्व.
१५.संचालक, निरी/संचालक,मीत्रा -नाशिक /संचालक,नीरी-नागपूर/ संचालक, उन्नत महाराष्ट्र अभियान, सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय
१६.उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी ह्या शासन परिपत्रकाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती /उपसभापती व गट विकास अधिकारी यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांना द्याव्यात.

१७.उप अभियंता, ग्रामिण पाणीपुरवठा उप विभाग सर्व

१८.पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.

१९.संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी सदरचा शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा.

२०.कार्यासन ( पापु-१६ ), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई. ( निवडनस्ती )

# <u>विवरणपत्र</u>

## स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा- II अंतर्गत गावनिहाय घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प आराखडा तयार करण्याकरिता मार्गदर्शिका

महत्वाचे टप्पे:-

**१). आराखडा तयार करण्याची कालमर्यादा:** सदर प्रकल्पाचा आराखडा दोन टप्प्यात करणे अपेक्षित आहे. पहिल्या टप्प्यात पुर्व तयारी व दुसऱ्या टप्प्यात प्रत्यक्ष आराखडा तयार करण्याची कार्यवाही खालीलप्रमाणे करणे अपेक्षित आहे. ( कालमर्यादा दोन दिवस )

**अ) पूर्वतयारी:**

- जिल्हा पाणी व स्वच्छता कक्षाने, प्रकल्पाचे आराखडे तयार करण्यासाठी, सर्व संबंधितांची क्षमता बांधणी करण्यासाठी प्रशिक्षण संबंधी कार्यवाही करावी.
- प्रकल्पाच्या अंमलबजावणीचे वेळापत्रक तयार करून ग्रामपंचायतीना, ग्रामस्थांना गावातील संस्थाना वेळापत्रक देण्यात यावे.
- ग्रामपंचायत स्तरावर बैठकीचे आयोजनामध्ये, प्रकल्प नियोजनाची माहिती देण्यात यावी.
- प्रकल्प आराखडा तयार करण्याकरिता, सहाय्यार्थ ग्रामस्तरीय विविध सामाजिक घटकांचा सहभाग असणारा गट निश्चिती करावी.
- ग्रामपंचायत स्तरावर, प्रकल्पातील गावाची लोकसंख्या, विविध संस्था, गावातील सार्वजनिक जागा आणि अस्तित्वातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन व्यवस्था, यापूर्वी स्वभामि (ग्रा)वा अन्य कृतीसंगमातून राबविलेल्या उपक्रमाची सांखिकीय माहिती संकलित करून, आवश्यकते नुसार ती सर्व संबंधितास उपलब्ध करून द्यावी. सदर माहिती संबधित ग्रामपंचायती करिता तयार करण्यात आलेल्या शाश्वत स्वच्छता आराखडा व स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा- II द्वितीय तपासणी मधील, उपलब्ध माहिती असावी.
- आराखडा तयार करण्यासाठी व्यावसायिक संस्था वा अन्य तांत्रिक सहाय्य पुरविणा-या यंत्रणा यांचा सहभाग आवश्यक असल्यास, त्यासंदर्भातील माहिती संकलित करावी.

**ब) कुटुंब, संस्थात्मक आणि सार्वजनिक स्तरीय स्वच्छतेच्या अनुषंगाने सर्वेक्षण आणि माहिती संकलन, पडताळणी आणि एकत्रिकरण:**

- या कार्यक्रमातंर्गत जिल्हा/तालुका कक्ष प्रतिनिधीने, जसे जिल्हास्तरीय तज्ञ, गट संसाधन केंद्र (BRC), समुह संसाधन केंद्र ( CRC ) स्थानिक गटाच्या मदतीने सर्वेक्षण करावे.
- गावातील सर्व कुटुंब व सर्व संस्थांना (शाळा, अंगणवाडी, ग्रामपंचायत कार्यालय, आरोग्य केंद्र इत्यादी.) प्रत्यक्ष भेटी देवून, कुटुंब स्तरावरील घनकचरा व सांडपाण्याचे प्रमाण, प्रकार, अस्तित्वातील व्यवस्थापन पद्धती, योग्य व्यवस्थापनासाठी उपलब्ध संसाधने (जागा, पाणी, बांधकाम साहित्य इत्यादी) यासंबंधी, माहितीचे संकलन. ( प्रपत्र क्र.१ ते ४ )

- गावातील बाजार, बस थांबे आणि मोकळ्या जागा आणि सर्व सार्वजनिक ठिकाणांना प्रत्यक्ष भेटी देवून, त्या ठिकाणी असणाऱ्या, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थेच्या अनुषंगाने, अस्तित्वातील व्यवस्थापन पद्धती व त्याची सद्यस्थिती (प्रपत्र क्र.५)
- माहिती पडताळणीअंती, कुटुंब, संस्था आणि सार्वजनिक ठिकाणाची प्राप्त माहिती संकिलत करावी व माहितीचे एकत्रिकरण करावे ( प्रपत्र क्र.१ ते ५ ).

**क) गाव स्वच्छता सद्यस्थिती सादरीकरण:** ग्रामपंचायत पदाधिकारी, शासकीय यंत्रणा आणि विविध सामाजिक संस्थासमवेत, एकत्रित माहिती बाबत सादरीकरणासह चर्चा करावी व संबधितांना गावाने केलेले प्रयत्न, अडचणी, अनुभव मांडण्याची संधी देवून, सक्रीय सहभागासाठी प्रवृत्त करावे.

**ड) प्रकल्प नियोजनातील तंत्रज्ञान, व्यवस्थापन समस्या व उपाययोजना:** संकलित माहिती व त्याच्या एकत्रिकरणानंतर, सादरीकरणा दरम्यान उपस्थित केलेले मुद्दे लक्षात घेवून, प्रकल्प नियोजनार्थ तंत्रज्ञानाची निवड व शाश्वतता, तंत्रज्ञानासाठी उपलब्ध जागा व संसाधने, भौगोलिक परिस्थिती, निधी उपलब्धता इत्यादी बाबी लक्षात घेवून, सविस्तर चर्चा करावी व किमान देखभाल व दुरूस्ती खर्चाचे तंत्रज्ञान, प्रकल्पासाठी सुनिश्चित करावे. केंद्र शासनाने https://jalshakti-ddws.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विविध मार्गदर्शक पुस्तिका, तसेच युनिसेफ व All India Local Self Government, Mumbai यांच्या सहकार्याने तयार केलेल्या, **"सांडपाणी घनकचरा व्यवस्थापन तंत्रज्ञान"** मार्गदर्शिका पुस्तिकेचा संदर्भ घ्यावा. केंद्र शासनाच्या संकेतस्थळावरील माशेलकर कमिटीद्वारा मान्यता प्रदान केलेली तंत्रज्ञाने अंमलबजावणीसाठी प्रस्तावित करता येईल तसेच, भौगोलिक परिस्थिती आधारे जिल्हा स्तरावर प्रस्तावित केलेली किमान देखभाल दुरूस्तीचा खर्च असणारी, अन्य तंत्रज्ञान प्रस्तावित करता येईल व त्यासंबधीची माहिती प्रपत्र क्र. ६ मध्ये नमूद करावी.

घनकचरा व्यवस्थापनासाठी, अनुज्ञेय असलेल्या निधीचा उल्लेख, संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन परिपत्रकासोबतच्या,**"प्रपत्र-ब"**मध्ये सविस्तरपणे करण्यात आला आहे, त्यानुसार, घनकचरा व्यवस्थापनाअंतर्गत, सार्वजनिक कंपोस्ट पिट, ट्राय सायकल, बॅटरी ऑपरेटेड ट्राय सायकल व गावासाठी प्लास्टिक कचरा साठवण करण्यासाठी शेडचे बांधकाम करणे यासाठी, स्वभामि (ग्रा) टप्पा-II नुसार, वित्तीय सहाय्य अनुज्ञेय राहिल. ५००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या गावासाठी, घनकचरा व्यवस्थापनाच्या कामाकरिता रू ६०/- प्रति व्यक्ती दराने, व ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावासाठी, घनकचरा व्यवस्थापनाच्या कामाकरिता रू ४५/- प्रति व्यक्ती दराने, घनकचरा व्यवस्थापनाच्या कामाकरिता अनुज्ञेय किंमतीमधून, उपांगासाठी लागणारी मजूरी, (स्वभामि (ग्रा) टप्पा-II संदर्भाधीन क्र.१ येथील केंद्र शासन मार्गदर्शक सूचना मधील परिच्छेद १५.२.(II) (a)) (मनरेगा वा इतर कृतीसंगमातून) वजावट करून, उर्वरित रकमेच्या ३०% तरतूद ही १५ व्या वित्त आयोगातून बंधनकारक करण्यात आली

आहे व ७०% स्वभामि (ग्रा) टप्पा-II (केंद्र ६०% व राज्य ४०%) नुसार अंतर्गत अनुज्ञेय असेल, त्यासंबंधी तरतूद आराखड्यामध्ये करावी. कृतीसंगम कामाविषयक उपांगाच्या नोंदी, ग्रामपंचायत विकास आराखडा (GPDP) तसेच अन्य प्रचलित संकेतस्थळी/आज्ञावली यावर, माहिती संचित करावी. या आराखड्यातील इतर घनकचरा विषयक कामे जसे, कुटुंबस्तरीय व सार्वजनिकस्तरीय कचरा कुंड्या, १५ वा वित्त आयोगातून, कुटुंबस्तरीय कंपोष्ट पिट, कचरा वर्गीकरण साठवण व कंपोष्ट प्रकल्प परिसराचे व्यवस्थापन करणेचे काम मनरेगा मधून, कचरा गोळा व वर्गीकरण करणे, यासाठीचे अदा करावयाचे मानधन/वेतन, कचरा वर्गीकरणासाठी आवश्यक अवजारे, परिसर स्वच्छतेसाठी आवश्यक अवजारे १५ वा वित्त आयोगातून व घनकचरा व्यवस्थापनाची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती ही कामे Business Model/ CSR Fund वा ग्राम पंचायत स्वनिधी वा इतर कृतीसंगमातून (Convergence),किमान ५ गाई असणाऱ्या कुटुंबांसाठी, गावस्तरीस बायोगॅस प्रकल्प NMRE च्या NNBOMP वा लाभार्थी सहभाग वित्तीय सहाय्याने, संबधित मंत्रालयीन विभागाने निर्गमित केलेल्या, मार्गदर्शक सूचनांचे पालन करून, उपागांची अंमलबजावणी करावी. (संदर्भाधीन क्रमांक २ शासन परिपत्रक मधील “विवरणपत्र-ड” ) केंद्र शासनाच्या “Plan Plus” या आज्ञावलीमध्ये, बंधनकारक व अन्य कृतीसंगमांची उपागांच्या बाबनिहाय नोंदी, करण्यात याव्यात.

सांडपाणी व्यवस्थापनासाठी अनुज्ञेय असलेल्या निधीचा उल्लेख, संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन परिपत्रका सोबतच्या **“प्रपत्र-ब”** मध्ये सविस्तरपणे करण्यात आला आहे, त्यानुसार, सांडपाणी व्यवस्थापना अंतर्गत, ५००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या गावांसाठी, सार्वजनिक शोषखड्डा/मॅजिक पिट/पाझर खड्डा ही कामे, स्वभामि अंतर्गत हाती घेता येतील, या गावातील उर्वरित कामे जसे कुटुंबस्तरीय शोषखड्डा/मॅजिक पिट/पाझर खड्डा, स्थिरीकरण तळे, Dewats, नाल्या व बंदिस्त गटारे, इत्यादी कामे व सांडपाणी व्यवस्थापनाची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती ही कामे ग्रामपंचायत स्वनिधी कृतीसंगमातून (Convergence) संबंधित मंत्रालयीन विभागाने निर्गमित केलेल्या, मार्गदर्शक सूचनांचे पालन करून हाती घेण्यात यावीत. (संदर्भाधीन क्रमांक २ “विवरणपत्र-ड”)

सांडपाणी व्यवस्थापना अंतर्गत, ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांसाठी, सार्वजनिक शोषखड्डा/मॅजिक पिट/पाझर खड्डा, गावातील घरापासून ते प्रक्रिया प्रकल्पापर्यंत बंदिस्त गटारे किंवा स्मॉल बोअर पाईप लाईन, स्थिरीकरण तळे, Constructed wet land, Dewats, फायटोराईड ही कामे, स्वभामि (ग्रा)टप्पा-II कार्यक्रमांतर्गत हाती घेता येईल. कुटुंबस्तरीय शोषखड्डा/मॅजिक पिट/पाझर खड्डा, एअरेशन ऑफ बीग पॉंड बिझीनेस मॉडेल वा ग्रामपंचायत स्वनिधीमधून, नाल्या/गटारे १५ वा वित्त आयोग / मनरेगा मधून व सांडपाणी व्यवस्थापनाची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती, ही कामे बिझीनेस मॉडेल वा ग्रामपंचायत स्वनिधी

कृतीसंगमातून (Convergence)संबधित मंत्रालयीन विभागाने निर्गमित केलेल्या, मार्गदर्शक सूचनांचे पालन करून, हाती घेण्यात यावीत. ( संदर्भाधीन क्रमांक २ "विवरणपत्र-ड" )

५००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या गावासाठी, सांडपाणी व्यवस्थापनाच्या कामाकरिता रू.२८०/- प्रति व्यक्ती दराने, व ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावासाठी, सांडपाणी व्यवस्थापनाच्या कामाकरिता रू ६६०/- प्रति व्यक्ती दराने, अनुज्ञेय किंमतीमधून, उपांगासाठी लागणारी मजूरी ( स्वभामि (ग्रा) टप्पा-II संदर्भातील केंद्र शासन मार्गदर्शक सूचना मधील परिच्छेद १५.२.(IV)) (मनरेगा वा इतर कृतीसंगमातून) वजावट करून, उर्वरित रकमेच्या ३०% तरतूद हि १५ व्या वित्त आयोगातून, बंधनकारक करण्यात आली आहे व ७०% स्वभामि अंतर्गत (केंद्र ६०% व राज्य ४०%) अनुज्ञेय असेल, त्यासंबधी, तरतूद आराखड्यामध्ये करावी तसेच, या अनुषंगाने मनरेगा तथा इतर कृतीसंगमांतर्गत, कामांचे नियोजन करावे.

ग्रामस्तरीय सांडपाण्याचे नियोजनासाठी, जिल्हा परिषद, धुळे अंतर्गत अंमलबजावणी करण्यात आलेल्या, कमी खर्चाच्या भूमिगत पाईप लाईन गटार व्यवस्थेच्या संदर्भातील अवलंबलेली कार्यपद्धती, अंदाजपत्रके, दर पृथ:करण व नकाशे तथा जिल्हा परिषद, धुळे यांचे सादरीकरण www.wsso.in या संकेतस्थळावर धुळे जिल्ह्यातील सांडपाणी व्यवस्थापनांतर्गत भूमिगत पाईप लाईन गटारबाबत अवलंबलेली कार्यपद्धती या नावाने link वर उपलब्ध आहे.

५००० पर्यंत लोकसंख्या असलेल्या गावांसाठी, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाचे अंदाजपत्रके व आराखडे, जिल्हयातील स्वच्छता तज्ञ यांनी तयार करावेत. ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या गावांसाठी, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाचे अंदाजपत्रके व आराखडे, उप अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा जिल्हा परिषद यांनी तयार करावेत.

**इ) निधी नियोजन:-** गावाच्या एकूण लोकसंख्येमधून, कुटुंब स्तरावरील, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या, उपांगाची लोकसंख्या वगळून, केवळ सार्वजनिक स्तरावरील उपाय योजनासाठीच्या लोकसंख्येसाठी, अनुज्ञेय अनुदान परिगणित करावे. स्वच्छ भारत मिशन (ग्रा)टप्पा-II नुसार, केवळ सार्वजनिक उपाययोजनांना उपांगनिहाय निधी उपलब्ध होणार आहे व उर्वरित उपाययोजना, या विविध कृतीसंगमातून ( पंधरावा वित्त आयोग, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, खासदार, आमदार निधी, CSR निधी, Business Model, ग्रामपंचायत स्वनिधी, लोकसहभाग वा केंद्र व राज्य शासनाच्या अन्य योजनांतर्गत प्राप्त होणारा निधी )(स्वभामि (ग्रा) टप्पा-II संदर्भातील केंद्र शासन मार्गदर्शक सूचना मधील Indicative List of Sanitation Activities and Suggested Convergence Matrix नुसार हाती घेणे अपेक्षित आहे. कृतीसंगमाचा तपशिल, "प्रपत्र क्र.७" प्रमाणे द्यावा. स्वभामि (ग्रा) टप्पा-II अंतर्गत प्राप्त प्रस्ताव, अर्ज प्राप्तीच्या क्रमानुसार, प्रथम प्राप्त झालेल्या व निकष पुर्ण करणा-या गावास, प्राथम्याने निधी

PFMS प्रणालीद्वारा संबंधित ग्रामपंचायतीस "Payee" म्हणून PFMS वर समाविष्ट करून, जिल्हास्तरावरून ग्रामपंचायतीस निधी PFMS प्रणालीद्वारे उपलब्ध करून द्यावा.

स्वभामि (ग्रा) टप्पा-II अंतर्गत अनुदान सामुदायिक घनकचरा व साडपाणी व्यवस्थापन उपांगासाठी, १५ वा वित्त आयोग सहाय्यासह, अनुज्ञेय आहे. मात्र, सार्वजनिक उपाययोजनांचा खर्च करताना, १५ वा वित्त आयोगाचा निधी अपूरा पडल्यास, स्वभामि (ग्रा) टप्पा-II अंतर्गत, अनुज्ञेयतेच्या मर्यादेपर्यतंचा खर्च स्वभामि (ग्रा) टप्पा-II मधून भागविण्यात यावा.

ई) **तालुकास्तरीय तथा जिल्हास्तरीय कृतीबाबतचे, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाचे नियोजन:**

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II च्या मार्गदर्शक सूचनानुसार, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पातंर्गत, तालुकास्तरीय मासिकपाळी व्यवस्थापन व प्लास्टिक कचरा व्यवस्थापन आणि जिल्हास्तरीय गोबरधन तथा मैलागाळ व्यवस्थापनाचे, नियोजन करणे आवश्यक आहे. मैला गाळ व्यवस्थापनाबाबत, प्रक्रिया व्यवस्था निर्माण करताना,गावातील ग्रामस्थांचा शौचालय प्रकार, नजिकच्या अस्तित्वातील मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्पाची Co-treatment संदर्भात सांगड घालावी. सदर व्यवस्थापनासाठी उपलब्ध तंत्रज्ञाने, जागा उपलब्धता, तालुका आणि जिल्हा स्तरावरील उपाययोजनांची गावाच्या लोकसंख्या आधारे, व्याप्तीच्या अनुषंगाने केंद्रित/ विकेंद्रित पद्धतीची व्यवस्था प्रस्तावित करणे व किमान खर्चाच्या देखभाल दुरूस्तीचे तंत्रज्ञान, अंमलबजावणीसाठी आराखड्यात समाविष्ठ करावे. तालुकास्तरीय मासिकपाळी व्यवस्थापन अंतर्गत, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ वा केन्द्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेव्दारा मान्यता प्राप्त इंसीनरेटर १५ वा वित्त आयोगातून प्रस्तावित करावेत. प्लास्टिक कचरा व्यवस्थापन अंतर्गत स्वभामि (ग्रा)टप्पा-II मधून तालुक्यातील गावांचा प्लास्टीक कचरा प्रक्रिया करणे कामी, तालुकास्तरिय, मटेरीयल रिकव्हरी फॅसिलीटी केन्द्र/प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेन्ट युनिटचे शेड, प्लास्टिक श्रेडर मशिन, प्लास्टिक बेलिग मशिन व डस्ट रिमूव्हर मशिन हि कामे रु. १६.०० लक्ष प्रति तालुका या मर्यादेपर्यंत हाती घेता येतील. गावातील प्लास्टिक कचरा संकलन शेडमधील साठवण केलेला कचरा, मटेरीयल रिकव्हरी फॅसिलीटी केन्द्र /प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेन्ट युनिटचे शेड पर्यंत वहन करण्यासाठीचा खर्च व प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेन्ट प्रकल्प देखभाल दुरूस्तीचा खर्च Business Model किंवा CSR Fund यामधून भागविण्यात यावा. गोबरधनसाठी स्वभामि (ग्रा) टप्पा-II मधून, जिल्ह्यामध्ये किमान एक सामुदायिक मॉडेल गोबरधन प्रकल्पासह, स्लरी प्रोसेसिंग युनिट व गायी गुरे असणाऱ्या डोंगराळ भागातील कुटुंबांसाठी, शेणावर आधारित कुटुंबस्तरीय बायोगॅस प्रकल्प, जिल्हयासाठी अनुज्ञेय असलेल्या एकूण रू.५०.०० लक्ष मधून हाती घेता येईल. गोबरधन अंतर्गत तालुक्यामध्ये प्रति तालुका १० स्केलिंग अप प्रकल्प, १५ वा वित्त आयोग व NMRE च्या

NNBOMP वा लाभार्थी सहभाग वित्तीय सहाय्याने हाती घ्यावे. गोबरधन प्रकल्पाची दैनंदिन देखभाल दुरूस्ती बिझीनेस मॉडेल मधून वा ग्रामपंचायत स्वनिधीतून करण्यात यावी. मैला गाळ व्यवस्थापनांतर्गत, जिल्ह्यातील सर्व गावातील, रेट्रोफिटींग शक्य नसलेल्या सिंगल पिट शौचालय व सेप्टिक टँक साठीच्या लोकसंख्येसाठी रु. २३०/- प्रति व्यक्ती या दराने येणाऱ्या किंमतीसाठी, मैला गाळ व्यवस्थापनांतर्गत, ट्रेंचिंग किंवा ट्रेंचिंग व फिकल स्लज ट्रिटमेन्ट प्लांट हाती घेता येईल. मैला गाळ व्यवस्थापनाबाबत, प्रक्रिया व्यवस्था निर्माण करताना, नजिकच्या अस्तित्वातील मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्पाची Co-treatment, ग्राम पंचायत स्वनिधीतून खर्च करावा. मानवी हस्तक्षेपाशिवाय करावयाचे मेक्यानाईज्ड ट्रान्स्पोर्टेशनचा व मैला गाळ व्यवस्थापन प्रकल्पाचा खर्च, दैनंदिन देखभाल दुरूस्ती बिझीनेस मॉडेल मधून वा ग्रामपंचायत स्वनिधीतून करावी.

**उ) माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम:**

माहिती, शिक्षण व संवाद अनुषंगाने, कशा प्रकारे कार्यवाही करावी, याबाबतचे सविस्तर विवेचन संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचनांमध्ये व संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन परिपत्रकामध्ये करण्यात आले आहे. या अनुषंगाने ग्रामसभेच्या विविध बैठका, मेळावे, कार्यशाळा, अभ्यास दौरे, प्रात्याक्षिके, स्पर्धा, गृहभेटी यासारख्या संवाद माध्यमांचा देखील समावेश करून, गावस्तरीय नियोजन “प्रपत्र क्र.८”, प्रमाणे करण्यात यावे.

**ऊ) क्षमता बांधणी:**

घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनातंर्गत, गावस्तरीय तथा जिल्हास्तरीय उपांगासाठी क्षमता बांधणी आवश्यक असून, त्यासाठी Unicef, त्यांच्या सहयोगी संस्था, Primove तथा All India Institute of Local Self Government यांच्या सहभागाने, विविध स्तरावरील उपांगनिहाय कालबद्ध प्रशिक्षणांच्या वेळापत्रकाची, आखणी करावी व यासंस्थांच्या सहकार्याने Online प्रशिक्षण पद्धतीच्या माध्यमातून क्षमता बांधणी करावी.

**ए) प्रकल्पाची अंमलबजावणी, देखभाल आणि दुरुस्ती:**

संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन परिपत्रकातील, मुद्दा क्रमांक ४.१ व ४.२ मध्ये प्रकल्पाच्या, शाश्वत देखभाल व दुरूस्तीबाबत सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. या अनुषंगाने, किमान खर्चाची देखभाल दुरुस्ती पद्धत, उपलब्ध तांत्रिक मनुष्यबळ, वार्षिक अंदाजित खर्च व इतर आवश्यक निधीचे नियोजन व गावातील युवकांना द्यावयाचे तांत्रिक प्रशिक्षण, या मुद्यांचा आराखड्यात उल्लेख करावा. स्थानिक प्रतिनिधित्व, महिला गट यांच्या सक्रिय सहभागाने, प्रकल्प अंमलबजावणी तथा देखभाल दुरूस्ती यासाठी, दायित्वा संदर्भातील माहिती “प्रपत्र ०९” मध्ये नमूद करावी. प्रकल्पाच्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीची कामे, बिझिनेस मॉडेल अथवा सी. एस. आर., कृती संगमातून किंवा ग्रामपंचायतीच्या स्वनिधीतून हाती घ्यावीत.

**ऐ) वार्षिक कृती आराखडा २०२०-२१ अंमलबजावणी वेळापत्रक:**

स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II अंतर्गत, राज्यस्तरीय योजना मंजूरी समितीने (SLSSC) मान्यता दिलेल्या गावासाठी, प्रत्यक्ष अंमलबजावणीचे तथा विविध उपांगाची, पुढील ५ वर्षाकरिता शाश्वत दैनंदिन व देखभाल दुरूस्तीचे नियोजनात्मक वेळापत्रक, "प्रपत्र १०" प्रमाणे तयार करावे. याअनुषंगाने, तयार करण्यात आलेल्या आराखड्याबाबत, गावातील सर्व स्तरावरून प्राप्त झालेल्या, ग्रामस्थांच्या/लोकप्रतिनिधींच्या सूचना लक्षात घेवून, आराखडा अंतिम करावा. केंद्र शासनाच्या SBM2.0Mobile App या मोबाईल ॲपमध्ये, गावाची अस्तित्वातील उपांगाच्या माहितीसह, सर्व माहिती अपडेट करावी. मोबाईल ॲप मध्ये माहिती संचित झाल्यानंतर, मोबाईल ॲपच्या माहिती संचित केल्याच्या स्क्रिन शॉटसह, संदर्भाधीन क्रमांक २ येथील शासन परिपत्रकासोबतच्या "प्रपत्र-अ" नुसार अर्ज, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, यांच्याकडे सादर करावा. "प्रपत्र-अ" सोबत जोडावयाच्या, ठरावाचा नमुना प्रपत्र १२ प्रमाणे राहिल. आराखडा नमुना प्रारुप, www.wsso.in या संकेतस्थळावर http://www.wsso.in/SBM२_ESTIMATE.pdf या नावाने link वर उपलब्ध आहे, त्यानुसार आराखडा तयार करावा. आराखडा तयार करण्यासाठी, https://www.sbm.gov.in वर उपलब्ध असलेल्या, संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचना विचारात घ्याव्यात. प्रकल्पाच्या पुर्णत्वासाठी अंमलबजावणी, पर्यवेक्षण इत्यादी विविध बाबींसाठी लागणा-या, तांत्रिक तज्ञ तथा तंत्रज्ञानाची निवड करणे व प्रकल्पासाठी लागू करण्यासाठी, संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचनामधील परिच्छेद १५.२ मधील "Administrative Charges" मध्ये दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाही करावी. ग्रामस्तरीय संनियंत्रणाच्या नियोजनाचे वेळापत्रक, "प्रपत्र ११" मध्ये देण्यात यावे. ग्रामस्तरीय सनियंत्रणाकरिता गट प्रमुख म्हणून, स्वच्छतेची आवड असणा-या, माहितगार व उस्तूक व्यक्तिंची निवड करावी.

**ओ) तातडीने करावयाची कामे :-**

राज्यामध्ये एकूण ४०,५९८ गावे असून, ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली, १८१२ गावे आहेत. सन २०२०-२१ च्या वार्षिक कृती आराखड्यामध्ये, एकूण ६२१८ गावे मंजूर असून, त्यापैकी, ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली, ७६३ गावे आहेत. ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या परंतू, वार्षिक कृती आराखडा सन २०२०-२१ मध्ये समाविष्ठ नसलेल्या, १०४५ गावांमध्ये कचरा ढिगा-याचा प्रश्न सोडविण्यासाठी, स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II अंतर्गत, किमान एक बॅटरी ऑपरेटेड ट्राय सायकल, गावासाठी घेण्यात यावी. सदर बॅटरी ऑपरेटेड ट्राय सायकलची खरेदी, गावस्तरावरून जेम्स पोर्टल https://gem.gov.in/ या केंद्र शासनाच्या संकेतस्थळावरून करावी. ५००० वरील लोकसंख्येची १०४५ गावे, सन २०२०-२१

च्या वार्षिक कृती आराखड्यात जरी समाविष्ठ नसली तरी, प्रस्तावित कामे जास्त खर्चाची नसल्याने व मोठ्या गावांचा घनकचरा व्यवस्थापनाचा प्रश्न तातडीने निकाली काढण्यासाठी, सन २०२०-२१ च्या वार्षिक कृती आराखडा सुधारित करून, सुधारित आराखड्यातील कामे, जसे खतखड्डे व गावामधील लोकांमध्ये जनजागृती निर्माण करण्याची कामे, स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II अंतर्गत, हाती घेता येतील. घनकचरा व्यवस्थापनांतर्गत कुटुंबस्तरीय तथा सार्वजनिक स्तरीय कच-याचे वर्गीकरण करणेकामी, कचरा कुंड्या उपलब्ध करून देणे, कचरा गोळा करणे, वर्गीकरण करणे व कचरा प्रक्रियास्थळापर्यंत वहन करण्याकरिता लागणारा मनुष्यबळ खर्च, १५ व्या वित्त आयोगातून, ग्राम विकास विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, सर्व बाबींचे तंतोतंत पालन करून हाती घेण्यात यावे.

---------------

# प्रपत्र ०१ घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन आराखड्यासाठी कुटुंब स्तर सर्वेक्षण आणि माहिती संकलन

गावाचे नाव ___________, ग्रामपंचायत : ________

| कुटुंबाची सर्वसाधारण माहिती | | | | शौचालयाचा प्रकार | | | | सांडपाणी (ग्रे) अस्तित्वातील विल्हेवाट पद्धती | | | | | शौचालय सांडपाणी (ब्लॅक वॉटर) विल्हेवाट पद्धती | | | | घनकचरा | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. | वार्ड क्रमांक | कुटुंब प्रमुखाचे नाव | कुटुंबातील सदस्यांची संख्या | एक शौच खड्डा | दोन शौच खड्डे | सेप्टिक टँक | इतर | शोषखड्डा | परसबाग | नाली/ गटर | नदी | उघड्यावर | शोषखड्डा | गटार | उघड्यावर | इतर | कचरा वर्गीकरण हो/नाही | साधारणत: ओल्या कचऱ्याचे प्रमाण (कि. ग्रॅम) | स्वतःचा खड्डा | एकत्र/ सार्वजनिक खड्डा |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

(प्रपत्र-०१ हे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत अस्तित्वातील उपांगासंबधात माहिती संकलन करण्याच्या उद्देशाने भरण्याचे नियोजन आहे. )

__ तालुका :  ___________ जिल्हा : ___________

| व्यवस्थापन | | | | | घनकचरा विल्हेवाट (सुका कचरा) | | | | | | मैला गाळ व्यवस्थापन ( शौचालय खड्डा किंवा सेप्टिक टाकी रिकामी करण्याची पद्धती) व्यवस्थापन | | | | घरगुती घातक कचरा विल्हेवाट (गोळया - औषधे - सॅनिटरी नॅपकिन) | | | | इतर माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बायोगॅस | कचरा कुंडी | उघड्यावर | ग्राम पंचायत संकलन | इतर | जाळतो | विकतो | कचरा कुंडी | नदीत फेकतो | ग्राम पंचायत संकलन | इतर | खड्डा उपसून खत शेतात टाकतात | खड्डा उपसून उघड्यावर टाकतात | सेप्टिक टाकी रिकामी करून मैला प्रक्रियेसाठी पाठवतात | सेप्टिक टाकी रिकामी करून मैला गावाबाहे उघड्यावर टाकून देतात | कचरा कुंडी | खडडयात विल्हेवाट | जाळतो | इतर | जनावरे संख्या |
| २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ | ३५ | ३६ | ३७ | ३८ | ३९ | ४० | ४१ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | |

## <u>प्रपत्र २</u> घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन आराखड्यासाठी शैक्षणिक संस्थास्तर (शाळा, अंगणवाडी इत्यादी) सर्वेक्षण आणि माहिती संकलन

गावाचे नाव ___________, ग्रामपंचायत : ___________ तालुका : ___________ जिल्हा : ___________

| प्राथमिक माहिती | | | | | | | | | पाणी व्यवस्था | | | | | | | शौचालय | | | | | | | | | | | | | | | | | | | | | मैला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनु. क्र. | अंगणवाडी/ शाळेचे कोड नंबर | अंगणवाडी/शाळेचे नाव | विद्यार्थी संख्या | | | शिक्षक संख्या | | | शाळेतील वापराच्या पाण्याच्या स्रोताचे प्रकार | | | | | पाण्याची टाकी | पुरेशा पाणी तोट्या | विद्यार्थी शौचालय संख्या ** | | शिक्षक शौचालय संख्या | | विद्यार्थी मुतारी संख्या | | शिक्षक मुतारी | शौचालय सद्यस्थिती (योग्य असल्यास टीक करा)* | | | | | | | | | | शौचालय प्रकार | | | | |
| | | | एकूण | मुले | मुली | एकूण | पुं | स्त्री | नळ | विहिर | हातपंप | बोअर | इतर | हो/नाही | हो/नाही | मुले | मुली | पुं | स्त्री | मुले | मुली | हो/नाही | इमारत | भांडे | छत | दरवाजा | हवा/उजेड | वीज | पाणी | संख्या पुरेशी (हो/नाही) | वापरास योग्य | वापरास योग्य नाही | १ पिट | २ पिट | सेप्टिक टँक | इतर (नमूद करावे) | खड्डा उपसून खत शेतात टाकतात |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ | ३५ | ३६ | ३७ | ३८ |
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | | □ | □ | □ | □ | □ | | □ |
| २ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | | □ | □ | □ | □ | □ | | □ |
| ३ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | | □ | □ | □ | □ | □ | | □ |
| ४ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | | □ | □ | □ | □ | □ | | □ |
| ५ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | □ | □ | □ | □ | □ | □ | □ | | □ | □ | □ | □ | □ | | □ |
| एकूण | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

**एक शीट म्हणजे एक शौचालय याप्रमाणे संख्या द्यावी.

* उपरोक्त चौकोनामध्ये √ टिक करावे अन्यथा रिक्त ठेवावे.

(प्रपत्र-०२ हे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत अस्तित्वातील शालेय संस्थात्मक उपांगासंबधात माहिती संकलन करण्याच्या उद्देशाने भरण्याचे नियोजन आहे.)

| गाळ व्यवस्थापन (शौचालय खड्डा किंवा सेप्टिक टाकी रिकामी करण्याची पद्धती) | | | शौचालय सांडपाणी (ब्लॅक वॉटर) व्यवस्थापन | | | | घनकचरा | | | | | सांडपाणी व्यवस्थापन (ग्रे) | | | | मासिकपाळी | | सिक रूम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | वर्गीकरण | व्यवस्थापन | | | | हात धुण्याची सोय | व्यवस्थापन | | | स्वतंत्र खोली | इन्सीनेरेटर | |
| खड्डा उपसून उघड्यावर टाकतात | सेप्टिक टाकी रिकामी करून मैला प्रक्रियेसाठी पाठवतात | सेप्टिक टाकी रिकामी करून मैला गावाबाहेर उघड्यावर टाकून देतात | शोषखड्डा □ | गटार □ | उघड्यावर | इतर (नमूद करावे) | हो/नाही | स्वतःचा खड्डा | सार्वजनिक खड्डा | ग्राम पंचायत संकलन व्यवस्था | इतर (नमूद करावे) | हो/नाही | शोषखड्डा | झाडे/झुडपे /सिंचन/परसबाग | गटार | (हो/नाही) | (हो/नाही) | (हो/नाही) |
| ३९ | ४० | ४१ | ४२ | ४३ | ४४ | ४५ | ४६ | ४७ | ४८ | ४९ | ५० | ५१ | ५२ | ५३ | ५४ | ५५ | ५६ | ५७ |
| □ | □ | □ | □ | □ | □ | | | □ | □ | □ | | | | | | | | |
| □ | □ | □ | □ | □ | □ | | | □ | □ | □ | | | | | | | | |
| □ | □ | □ | □ | □ | □ | | | □ | □ | □ | | | | | | | | |
| □ | □ | □ | □ | □ | □ | | | □ | □ | □ | | | | | | | | |
| □ | □ | □ | □ | □ | □ | | | □ | □ | □ | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | |

## प्रपत्र ३  घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन आराखड्यासाठी आरोग्य केंद्र  सर्वेक्षण आणि

| गावाचे नाव | | | ग्रामपंचायत | | | तालुका | | | जिल्हा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राथमिक माहिती | | | मैला गाळ व्यवस्थापन ( शौचालय खड्डा किंवा सेप्टिक टाकी रिकामी करण्याची पद्धती)  व्यवस्थापन | | | | शौचालय सांडपाणी (ब्लॅक वॉटर) व्यवस्थापन | | | |
| अनु. क्र. | आरोग्य केंद्र नाव | अस्तित्वातील शौचालय संख्या * | खड्डा उपसून खत शेतात टाकतात | खड्डा उपसून उघड्यावर टाकतात | सेप्टिक टाकी रिकामी करून मैला प्रक्रियेसाठी पाठवतात | सेप्टिक टाकी रिकामी करून मैला गावाबाहेर उघड्यावर टाकून देतात | शोषखड्डा | गटार /नदी/ तलाव इत्यादी | उघड्याव र | इतर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| १ | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | |

* एक शीट म्हणजे एक शौचालय याप्रमाणे संख्या द्यावी.

(प्रपत्र-०३ हे  घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत अस्तित्वातील आरोग्य संस्थात्मक उपांगासंबधात माहिती संकलन करण्याच्या उद्देशाने भरण्याचे नियोजन आहे.

# माहिती संकलन

| घनकचरा व्यवस्थापन | | | | | वैद्यकीय कचरा व्यवस्थापन | | | सांडपाणी व्यवस्थापन (ग्रे) व्यवस्थापन | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्गीकरण होय/ नाही | स्वतःचा खड्डा /Compost Pit | सार्वजनिक खड्डा | ग्राम पंचायत संकलन व्यवस्था | इतर | आरोग्य केंद्राचा स्वतःचा खत खड्डा | ग्राम पंचायत संकलन व्यवस्था | इतर | आरोग्य केंद्रामध्ये हात धुण्याची सोय आहे / नाही | शोषखड्डा | नाली/ गटर | उघड्यावर |
| १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |

)

## प्रपत्र ४ घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन आराखड्यासाठी सार्वजनिक शौचालय सर्वेक्षण आणि माहिती संकलन

**गावाचे नाव ___________, ग्रामपंचायत : ___________ तालुका : ___________ जिल्हा : ___________**

| अनु. | सार्वजनिक शौचालय नाव/शौचालयामध्ये किती बैठक(sheet) /शौचालय वापरणा-याची लोकसंख्या | पाण्याची उपलब्धतता पुरेशी आहे का | वापराच्या पाण्याचे स्त्रोत | **शौचालय देखभाल यंत्रणा** | | | | **मैला गाळ व्यवस्थापन ( शौचालय खड्डा किंवा सेप्टिक टाकी रिकामी करण्याची पद्धती) व्यवस्थापन** | | | | **शौचालय सांडपाणी (ब्लॅक वॉटर) व्यवस्थापन** | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ग्रामपंचायत | बचत गट | बाजार समिती | इतर | खड्डा उपसून खत शेतात टाकतात | खड्डा उपसून उघड्यावर टाकतात | सेप्टिक टाकी रिकामी करून मैला प्रक्रियेसाठी पाठवतात / प्रक्रिया व्यवस्था( STP) आहे किंवा कसे | सेप्टिक टाकी रिकामी करून मैला गावाबाहेर उघड्यावर टाकून देतात | शोषखड्डा | गटार | उघड्यावर | इतर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| २ | | | | | | | | | | | | | | | |
| **एकूण** | | | | | | | | | | | | | | | |

(प्रपत्र-०४ हे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत सार्वजनिक शौचालय, अस्तित्वातील माहिती संकलन करण्याच्या उद्देशाने भरण्याचे नियोजन आहे. )

## प्रपत्र ५ घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन आराखड्यासाठी इतर संस्था सर्वेक्षण आणि माहिती संकलन

गावाचे नाव : ग्रामपंचायत : तालुका : जिल्हा :

| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्राथमिक माहिती | | | | मैला गाळ व्यवस्थापन ( शौचालय खड्डा किंवा सेप्टिक टाकी रिकामी करण्याची पद्धती) | | | | शौचालय सांडपाणी (ब्लॅक वॉटर)व्यवस्थापन | | | | | घनकचरा व्यवस्थापन | | | | | सांडपाणी व्यवस्थापन (ग्रे) | | | |
| अनु. | संस्थेचा कोड नंबर | कार्यालयाचे नाव /संस्थेचे नाव | शौचालय संख्या | खड्डा उपसून खत शेतात टाकतात | खड्डा उपसून उघड्यावर टाकतात | सेप्टिक टाकी रिकामी करून मैला प्रक्रियेसाठी पाठवतात /STP Loacation | सेप्टिक टाकी रिकामी करून मैला गावाबाहेर उघड्यावर टाकून देतात | शोषखड्डा | गटार | उघड्यावर | शेतीसाठी | इतर | कचरा वर्गीकरण हो/नाही | स्वतःचा खड्डा | सार्वजनिक खड्डा | ग्राम पंचायत संकलन व्यवस्था | इतर | शोषखड्डा | झाडांना दिले जाते | गटार | उघड्यावर |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

(प्रपत्र-०५ हे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत इतर संस्थांबाबत अस्तित्वातील माहिती संकलन करण्याच्या उद्देशाने भरण्याचे नियोजन आहे. )

# प्रपत्र ०६ घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन आराखड्यासाठी समस्या, उपाययोजना आणि तंत्रज्ञान निश्चिती (भाग ०१)

गावाचे नाव : ग्रामपंचायत : तालुका : जिल्हा :

| क्र | स्तर | एकूण लोकसंख्या | व्यवस्थापन समस्या | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | घनकचरा **व्यवस्थापन** उपांगे | घनकचरा उपांगे संख्या | **उपांग लोक**संख्या | सांडपाणी **व्यवस्थापन** उपांगे | सांडपाणी **व्यवस्थापन** उपांगे संख्या | उपांग लोकसंख्या | मैलागाळ उपांगे | मैलागाळ उपांगे संख्या | उपांग लोकसंख्या | उपलब्ध इनसिनेटर | लोकसंख्या |
| १ | कुटुंब | | खतखड्डा/खत कुंडी | | | शोषखड्डा/ मॅजिक पिट | | | | शौचखड्डे | | | |
| | | | ट्राय सायकल/बॅटरी ऑपरेटेड ट्राय सायकल | | | सार्वजनिक शोषखड्डा/ मॅजिक पिट | | | | सेप्टीक टँक | | | |
| | | | प्लास्टिक स्टोरेज शेड | | | डिवॅट/स्थिरीकरण तळे/इतर स्मॉल बोअर बंदिस्त गटारासह | | | | ट्रेंचिंग | | | |
| २ | शाळा | | खतखड्डा/खत कुंडी॰ | | | शोषखड्डा/ मॅजिक पिट | | | | शौचखड्डे | | | |
| | | | ट्राय सायकल/बॅटरी ऑपरेटेड ट्राय सायकल | | | सार्वजनिक शोषखड्डा/ मॅजिक पिट | | | | सेप्टीक टँक | | | |
| | | | प्लास्टिक स्टोरेज शेड | | | डिवॅट/स्थिरीकरण तळे/इतर स्मॉल बोअर बंदिस्त गटारासह | | | | ट्रेंचिंग | | | |
| ३ | अंगणवाडी | | खतखड्डा/खत कुंडी॰ | | | शोषखड्डा/ मॅजिक पिट | | | | शौचखड्डे | | | |
| | | | ट्राय सायकल/बॅटरी ऑपरेटेड ट्राय सायकल | | | सार्वजनिक शोषखड्डा/ मॅजिक पिट | | | | सेप्टीक टँक | | | |
| | | | प्लास्टिक स्टोरेज शेड | | | डिवॅट/स्थिरीकरण तळे/इतर स्मॉल बोअर बंदिस्त गटारासह | | | | ट्रेंचिंग | | | |
| ४ | आरोग्यकेंद्र | | खतखड्डा/खत कुंडी॰ | | | शोषखड्डा/ मॅजिक पिट | | | | शौचखड्डे | | | |
| | | | ट्राय सायकल/बॅटरी ऑपरेटेड ट्राय सायकल | | | सार्वजनिक शोषखड्डा/ मॅजिक पिट | | | | सेप्टीक टँक | | | |
| | | | प्लास्टिक स्टोरेज शेड | | | डिवॅट/स्थिरीकरण तळे/इतर स्मॉल बोअर बंदिस्त गटारासह | | | | ट्रेंचिंग | | | |
| ५ | इतर संस्था | | खतखड्डा/खत कुंडी॰ | | | शोषखड्डा/ मॅजिक पिट | | | | शौचखड्डे | | | |
| | | | ट्राय सायकल/बॅटरी ऑपरेटेड ट्राय सायकल | | | सार्वजनिक शोषखड्डा/ मॅजिक पिट | | | | सेप्टीक टँक | | | |
| | | | प्लास्टिक स्टोरेज शेड | | | डिवॅट/स्थिरीकरण तळे/इतर स्मॉल बोअर बंदिस्त गटारासह | | | | ट्रेंचिंग | | | |
| ६ | इतर सार्वजनिक ठिकाणे | | खतखड्डा/खत कुंडी॰ | | | शोषखड्डा/ मॅजिक पिट | | | | शौचखड्डे | | | |
| | | | ट्राय सायकल/बॅटरी ऑपरेटेड ट्राय सायकल | | | सार्वजनिक शोषखड्डा/ मॅजिक पिट | | | | सेप्टीक टँक | | | |
| | | | प्लास्टिक स्टोरेज शेड | | | डिवॅट/स्थिरीकरण तळे/इतर स्मॉल बोअर बंदिस्त गटारासह | | | | ट्रेंचिंग | | | |

(प्रपत्र-०६ (१) हे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत व्यवस्थापन समस्यांबाबत माहिती संकलन करण्याच्या उद्देशाने भरण्याचे नियोजन आहे.)

# प्रपत्र ०६ घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन आराखड्यासाठी समस्या, उपाययोजना आणि तंत्रज्ञान निश्चिती (भाग ०२)

गावाचे नाव : ग्रामपंचायत : तालुका :

जिल्हा :

| क्र | स्तर | एकूण लोक संख्या | व्यवस्थापन उपाययोजना | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | घनकचरा **व्यवस्थापन** उपांगे | लोक संख्या | सांडपाणी व्यवस्थापन उपांगे | उपांग लोकसंख्या | मैलागाळ उपांगे | उपांग लोकसंख्या | मासिकपाळी शोषके | उपांग लोकसंख्या |
| १ | कुटुंब | | दुरूस्ती/पुनर्जिवितीकरण/अस्तित्वातील उपांगे रद्द करून नवीन प्रस्तावित | | | | | | | |
| २ | शाळा | | दुरूस्ती/पुनर्जिवितीकरण/अस्तित्वातील उपांगे रद्द करून नवीन प्रस्तावित | | | | | | | |
| ३ | अंगणवाडी | | दुरूस्ती/पुनर्जिवितीकरण/अस्तित्वातील उपांगे रद्द करून नवीन प्रस्तावित | | | | | | | |
| ४ | आरोग्यकेंद्र | | दुरूस्ती/पुनर्जिवितीकरण/अस्तित्वातील उपांगे रद्द करून नवीन प्रस्तावित | | | | | | | |
| ५ | इतर संस्था | | दुरूस्ती/पुनर्जिवितीकरण/अस्तित्वातील उपांगे रद्द करून नवीन प्रस्तावित | | | | | | | |
| ६ | इतर सार्वजनिक ठिकाणे | | दुरूस्ती/पुनर्जिवितीकरण/अस्तित्वातील उपांगे रद्द करून नवीन प्रस्तावित | | | | | | | |

(प्रपत्र-०६ (२) हे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत व्यवस्थापन उपाययोजनाबाबत माहिती संकलन करण्याच्या उद्देशाने भरण्याचे नियोजन आहे. )

# प्रपत्र ०६ घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन आराखड्यासाठी समस्या, उपाययोजना आणि तंत्रज्ञान निश्चिती (भाग ०३)

गावाचे नाव : ग्रामपंचायत : तालुका :
जिल्हा :

| क्र | स्तर | एकूण लोक संख्या | व्यवस्थापन तंत्रज्ञान निवड | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | घनकचरा निवडलेले तंत्रज्ञान | उपांग लोकसंख्या | सांडपाणी निवडलेले तंत्रज्ञान | उपांग लोकसंख्या | मैलागाळ निवडलेले तंत्रज्ञान | उपांग लोकसंख्या | मासिकपाळी शोषके निवडलेले तंत्रज्ञान | उपांग लोकसंख्या |
| १ | कुटुंब | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| २ | शाळा | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| ३ | अंगणवाडी | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| ४ | आरोग्यकेंद्र | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| ५ | इतर संस्था | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |
| ६ | इतर सार्वजनिक ठिकाणे | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | |

(प्रपत्र-०६ (३) हे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत व्यवस्थापन तंत्रज्ञान निश्चितीबाबत माहिती संकलन करण्याच्या उद्देशाने भरण्याचे नियोजन आहे. )

# प्रपत्र ०७ : घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन आराखड्यासाठी निधी व्यवस्थापन
## (५ वर्षाच्या देखभाल दुरूस्ती खर्चासह)

**गावाचे नाव :** **ग्रामपंचायत :** **तालुका :**

**जिल्हा :**

| क्र | स्तर | उपक्रमाचे नाव | एकूण लोक संख्या | धोरणातील निकषानुसार प्रती माणशी खर्च | एकूण अपेक्षित खर्च | निधी स्रोत तपशील | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | स्वच्छ भारत मिशन (ग्रा) | पंधरावा वित्त आयोग | नरेगा | कुटुंब सहभाग | सीएसार | लोक सहभाग | इतर (तपशील द्या) | एकूण |
| १ | कुटुंब | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| २ | शाळा | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| ३ | अंगणवाडी | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| ४ | आरोग्यकेंद्र | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| ५ | इतर संस्था | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| ६ | सार्वजनिक ठिकाणे | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | | |

(प्रपत्र-०७ हे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत निधी व्यवस्थापन कृतीसंगमाच्या माहिती संकलन करण्याच्या उद्देशाने भरण्याचे नियोजन आहे. )

## प्रपत्र ०८ स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-॥
## गावनिहाय घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन आराखडा, माहिती, शिक्षण व संवाद उपक्रम नियोजन प्रपत्र

| क्र. | संवाद घटक | सहभागी घटकनिहाय संवाद उपक्रम | | | संवाद साहित्य | संवाद पद्धती | सहभागी अपेक्षित घटक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | कुटुंबस्तर | संस्थास्तर | सार्वजनिक स्तर | | | | |
| १ | घनकचरा व्यवस्थापन | गृहभेटी,<br>लक्षगट,<br>प्रत्यक्ष चर्चा,<br>अभ्यास दौरे स्पर्धा. | | | मार्गदर्शिका, शासन परिपत्रक, पोस्टर, फ्लिपचार्ट, जेम, पाकेट डायरी, पझल, चित्रपुस्तिका, | आंतरव्यक्ति,<br>समुह,<br>दुरस्थ<br>आडिओ<br>व्हिडीओ<br>संवाद | | |
| | | | | | | | | |
| २ | सांडपाणी व्यवस्थापन | परसबाग,<br>शोषखड्डे,<br>स्थिरिकरण तळे,<br>डिवॅटस,<br>इतर तंत्रज्ञान माहिती. | | | | | | |
| | | | | | | | | |
| ३ | मैलागाळ व्यवस्थापन | रिट्रोपिटींग काळे पाणी व्यवस्थापन,<br>मैला व्यवस्थापनाच्या पद्धती | | | | | | |
| | | | | | | | | |
| ४ | प्लास्टिक कचरा व्यवस्थापन | प्लास्टिक कचरा, | | | | | | |
| | | | | | | | | |
| ५ | मासिक पाळीत वापरलेल्या शोषकांचे | | | | | | | |
| ६ | गोबरधन प्रकल्प | | | | | | | |
| | | | | | | | | |

स्वच्छाग्रही, आरोग्यपोषण स्वच्छता व पाणी पुरवठा समितीच्या मदतीने गावात संवाद. गट संसाधन केंद्र, स्वच्छताग्रही यांच्या मदतीने करतील, गरज पडल्यास तालुका कक्षाने मदत करावी व संवाद साहित्य उपलब्ध करावे.

(प्रपत्र-०८ हे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत निधी व्यवस्थापन माहिती, शिक्षण व संवाद अनुषंगाने उपक्रमांची तथा संवाद साहित्य, संवाद पद्धती व सहभागी अपेक्षित घटकांची माहिती संकलन करण्याच्या उद्देशाने भरण्याचे नियोजन आहे. )

//प्रपत्र-०९//

## स्वभामि (ग्रा) टप्पा-॥ अंतर्गत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या उपांगासाठी अंदाजपत्रकीय तरतूद व निधी तपशिल

ग्रामपंचायत ________________ तालुका _____________ जिल्हा ________________

| अक्र | उपांग | अस्तित्वातील उपांगे संख्या | प्रस्तावित उपांगे संख्या | अंदाजपत्रकीय किमत | निधी स्रोत व लागणारा निधी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | स्वभामी ( केंद्र ) | स्वभामी (राज्य ) | स्वभामी ( एकूण ) | १५ वा वित्त आयोग | मनरेगा | बिझिनेस मॉडेल / सीएसआर | इतर (ग्रापं स्व निधी) |
| अ | वैयक्तिक स्तर कुटुंब स्तर शौचालय | | | | | | | | | | |
| १ | शौचालय रेट्रोफिटिंग | | | | | | | | | | |
| २.१ | सामुदायिक/ सार्वजनिक शौचालय संकुल | | | | | | | | | | |
| २.२ | सामुदायिक/ सार्वजनिक शौचालय संकुल देखभाल व दुरूस्ती | | | | | | | | | | |
| ३.१ | कुटुंबस्तरीय कचरा कुंडी | | | | | | | | | | |
| ३.२ | सार्वजनिकस्तरीय कचरा कुंडी | | | | | | | | | | |
| ३.३ | कुटुंबस्तरीय खतकुंडी/खत खड्डे | | | | | | | | | | |
| ३.४ | सार्वजनिक खतखड्डे | | | | | | | | | | |
| ३.५ | सार्वजनिक खत प्रक्रिया -पाईल कम्पोस्टिंग | | | | | | | | | | |
| ३.६ | सार्वजनिक खत प्रक्रिया -परमनंट टँक मेथड | | | | | | | | | | |
| ३.७ | सार्वजनिक खत प्रक्रिया -गांडूळ खत | | | | | | | | | | |
| ३.८ | सार्वजनिक खत प्रक्रिया -विन्ड्रो कम्पोस्टिंग | | | | | | | | | | |
| ३.९ | सार्वजनिक खत प्रक्रिया -रोटरी ड्रम कम्पोस्टिंग | | | | | | | | | | |
| ३.१० | ट्राय सायकल/बॅटरी ऑपरेटेड ट्राय सायकल | | | | | | | | | | |
| ३.११ | इतर वाहन | | | | | | | | | | |
| ३.१२ | प्लास्टिक कचरा संकलन शेड | | | | | | | | | | |
| ३.१३ | कचरा वर्गीकरण, साठवण व खत परिसर व्यवस्था सेटअप | | | | | | | | | | |
| ३.१४ | कचरा गोळा करणाऱ्या व वर्गीकरण करणाऱ्या मनुष्यबळाचे वेतन | | | | | | | | | | |
| ३.१५ | कचरा वर्गीकरण व परिसर सफाईसाठी उपयुक्त अवजारे व साहित्य | | | | | | | | | | |
| ३.१६ | घनकचरा व्यवस्थापन देखभाल व दुरूस्ती | | | | | | | | | | |
| | घनकचरा व्यवस्थापन स्वभामि (ग्रा)टप्पा-॥ सार्वजनिक उपांगाच्या लोकसंख्येसाठी अनुज्ञेयता | | | | | | | | | | |

| अक्र | उपांग | अस्तित्वातील उपांगे संख्या | प्रस्तावित उपांगे संख्या | अंदाजपत्रकीय किमत | निधी स्त्रोत व लागणारा निधी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | स्वभामी ( केंद्र ) | स्वभामी (राज्य ) | स्वभामी ( एकूण ) | १५ वा वित्त आयोग | मनरेगा | बिझिनेस मॉडेल / सीएस आर | इतर (ग्रापं स्व निधी) |
| ४ | सांडपाणी व्यवस्थापन | | | | | | | | | | |
| ४.१.१ | कुटुंबस्तरीय शोषखड्डे | | | | | | | | | | |
| ४.१.२ | कुटुंबस्तरीय परसबाग | | | | | | | | | | |
| ४.२ | सार्वजनिक शोषखड्डे | | | | | | | | | | |
| ४.३ | सार्वजनिक मॅजिक पिट | | | | | | | | | | |
| ४.४ | सार्वजनिक लीच पिट | | | | | | | | | | |
| ४.५ | सार्वजनिक पाझर खडडा | | | | | | | | | | |
| ४.६ | सार्वजनिक परसबाग | | | | | | | | | | |
| ४.७ | स्मॉल बोअर ड्रेनेज/सिवर | | | | | | | | | | |
| ४.८ | स्थिरीकरण तळे | | | | | | | | | | |
| ४.९ | पिक्सी कल्चर / फॉक्सनट | | | | | | | | | | |
| ४.१ | डिवॅटस | | | | | | | | | | |
| ४.११ | सॉईल टेक | | | | | | | | | | |
| ४.१२ | इन्टीग्रेटेड वेट लँड | | | | | | | | | | |
| ४.१३ | पायथोराईड | | | | | | | | | | |
| ४.१४ | ॲनारॉबिक वी. आर. (ABR) | | | | | | | | | | |
| ४.१५ | शुद्धीकरण केंद्र | | | | | | | | | | |
| ४.१६ | इतर तंत्रज्ञान | | | | | | | | | | |
| ४.१७ | खुल्या नाल्या व गटारे. | | | | | | | | | | |
| | सांडपाणी व्यवस्थापन स्वभामि (ग्रा)टप्पा-II सार्वजनिक उपांगाच्या | | | | | | | | | | |
| | गावासाठी एकूण अनुज्ञेयता | | | | | | | | | | |
| | व्यावसायिक संस्थां शुल्क | | | | | | | | | | |
| | त्रयस्थ यंत्रणा तपासणी शुल्क | | | | | | | | | | |
| | कॉन्टीनजन्सी | | | | | | | | | | |
| | वर्क चार्ज एस्टॅब्लिशमेंट | | | | | | | | | | |
| | एकूण रक्कम रूपये | | | | | | | | | | |

प्रपत्र-९ सर्व उपांगाची कृतीनिहाय संगमासहित स्वभामि (ग्रा) टप्पा-II अंतर्गत लागणारा निधी व अंदाजपत्रकीय तरतूदीचा तपशिल दर्शविण्यासाठी आहे.

## प्रपत्र १० स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-II गावनिहाय घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन आराखडा
## सामाजिक सनियंत्रण नियोजन प्रपत्र

| क्र. | सनियंत्रण विषय | उपक्रमांची सद्यस्थिती | सनियंत्रण गटप्रमुखाचे नाव | सनियंत्रण गटातील सदस्याचे नाव | मासिक क्षेत्रभेटीचा अपेक्षित दिनांक | पुनर्विलोकन बैठकीचा अपेक्षित दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कुटुंबस्तरावरील अंमलबजावणी | | | | | | |
| २ | संस्थात्मक स्तरावरील अंमलबजावणी | | | | | | |
| ३ | सार्वजनिक स्तरावरील अंमलबजावणी | | | | | | |
| ४ | लोकसहभाग निश्चिती | | | | | | |
| ५ | स्वच्छता साधनांची निर्मिती, निगा, देखभाल आणि दुरुस्ती | | | | | | |

(प्रपत्र-१० हे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन अंतर्गत सामाजिक सनियंत्रण माहिती संकलन करण्याच्या उद्देशाने भरण्याचे नियोजन आहे. )

# प्रपत्र ११ स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा ॥
## गावनिहाय घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन आराखडा
## उपक्रम अंमलबजावणी वेळापत्रक प्रपत्र

| क्र. | घनकचरा सांडपाणी घटकवार उपक्रम तपशील | महिना ०१ * | महिना ०२ | महिना ०३ | महिना ०४ | महिना ०५ | महिना ०६ | महिना ०७ | महिना ०८ | महिना ०९ | महिना १० | महिना ११ | महिना १२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सांडपाणी व्यवस्थापन | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| | | | | | | | | | | | | | |
| २ | घनकचरा व्यवस्थापन | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| | | | | | | | | | | | | | |
| ३ | मैलागाळ व्यवस्थापन | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| | | | | | | | | | | | | | |
| ४ | प्लास्टिक कचरा व्यवस्थापन | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| | | | | | | | | | | | | | |
| ५ | मासिक पाळीत वापरलेल्या शोषकांचे व्यवस्थापन | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| | | | | | | | | | | | | | |
| ६ | गोबरधन प्रकल्प | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ | ☐ |
| | | | | | | | | | | | | | |

***योग्य असल्यास √ येथे टीक करावे.**

(प्रपत्र-११ हे घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प अंमलबजावणी वेळापत्रक माहिती संकलन करण्याच्या उद्देशाने भरण्याचे नियोजन आहे. )

# प्रपत्र-१२

ग्रामपंचायत------------
ता.------जि.--------
दि. / /

**मासिक सभा**

कार्यवृत्तांत

आज दि. / / रोजी मौ ग्रामपंचायत---------ता. ------जि.-------ची मासिक सभा आयोजित करण्यात आली आहे. सभेचे अध्यक्ष म्हणून श्री/श्रीमती.-----------------पदनाम-------हे उपस्थित होते. तर सचिव म्हणून श्री/श्रीमती.-------------------ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी ग्रामपंचायत--------------हे उपस्थित होते.

सदर सभेत पुढील प्रमाणे विषयावर चर्चा होऊन ठराव समंत झाले आहेत.

विषय क्र. (---) ----या गावाकरिता स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-॥ अंतर्गत
घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन उपक्रम राबविण्याबाबत.

सुचक :श्री/श्रीमती ------------- अनुमोदक श्री/श्रीमती----------

**ठराव क्र. (--- )**

राज्यामध्ये केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना माहे जुलै २०२० अन्वये स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा- ॥ राबविण्यात येत आहे. याबाबत सुचक यांनी सुचविल्या प्रमाणे--- गाव, ग्रामपंचायत.---------ता.-------जि.--------- या गावामध्ये, सर्वागीण स्वच्छतेसाठी, स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा- ॥ अंतर्गत, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन उपक्रम राबवावयाचा आहे. याबाबत सचिव, ग्रामपंचायत.---- यांनी सदर बैठकीमध्ये कार्यक्रमाशी संबधित मार्गदर्शक सुचना, शासन परिपत्रक, शासन निर्णय इत्यादीचे वाचन केले. सदर विषयाच्या अनुषंगाने, आयोजित बैठकीमध्ये सविस्तर चर्चा झाली व पुढील प्रमाणे ठराव मंजुर करण्यात आला.

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचना माहे जुलै २०२० चे पृष्ठ क्र. ५० वर नमुद केल्याप्रमाणे, उपांगनिहाय अनुज्ञेयता तथा बंधनकारक कृतिसंगमे यांच्या अधीन राहून, सदर मार्गदर्शक सूचना पृष्ठ क्रमांक ११० व १११ वर नमूद केल्याप्रमाणे, स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा- ॥ आणि अन्य विविध कृतिसंगमे यांच्या माध्यमातून हाती घ्यावयाच्या उपागांसाठी निधीचे नियोजन व अंमलबजावणी करण्यात येईल. राबवावयाच्या प्रकल्पाकरिता लागणारी आवश्यक जागा या ग्रामपंचायतीकडे उपलब्ध आहे तसेच योजनेत समाविष्ठ उपगांची कामे पुर्ण झाल्यानंतर, त्याअनुषंगाने, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी आवश्यक असणारी शाश्वत देखभाल व दुरुस्ती, ग्रामपंचायतीच्या स्वनिधीतून करण्यात येईल, अशी हमी सदर ग्रामपंचायत देत आहे. सभेमध्ये याबाबत चर्चा होवून, ठरावास एकमताने मान्यता देण्यात आली.

स्वाक्षरी

| | |
|---|---|
| अध्यक्ष | सचिव |
| ग्राम पंचायत ------ तालुका -------- | ग्राम पंचायत -----------तालुका --------- |
| जिल्हा ------------- | जिल्हा ---------------------- |